मराठी विभाग आयोजित

२९ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# आधुनिक भारताच्या जडणघडणीत देश आणि विदेशातील व्यक्तिमत्त्वांचे योगदान




संपादक

लुडमिला सेकाचेव्हा । डॉ. संजय नगरकर । डॉ. स्नेहल तावरे

प्रा.सुखदेव कोल्हे


Scanned with OKEN Scanner

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in or introduced into a retrieval system or transmitted in any form or by any means (electrical, mechanical, photocopying, recording or otherwise) without the prior written permission of the author or publisher. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

- स्नेहवर्धन प्रकाशन क्र : १५२२

- **आधुनिक भारताच्या जडणघडणीत देश आणि विदेशातील व्यक्तिमत्त्वांचे योगदान**

- **प्रकाशक आणि मुद्रक :**
  डॉ. स्नेहल तावरे
  स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
  पुणे ४११०३०.
  स्थिरसंवाद : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३ ६९ ६१
  भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१ / ९०७५०८१८८८
  ई मेल : snehaltawre@gmail.com

- © S.R.I.

- **प्रथमावृत्ती** : १२ फेब्रुवारी २०२५
  २९ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

- **मुखपृष्ठ :** संतोष धोंगडे

- **अक्षरजुळणी** : स्मिता टाइपसेटर्स, पुणे ३०

- ISBN 978 - 81 - 19301 - 31 - 7

- **पृष्ठसंख्या** : १८४

- **मूल्य : ₹ ३५०/-**
  **$ 5**

Scanned with OKEN Scanner

१६. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे मराठी वाङ्मय निर्मितीतील योगदान — डॉ. भारती काळे / ७५

१७. आधुनिक भारताच्या जडणघडणीत संत गाडगेबाबांचे योगदान — डॉ. आप्पा माने / ७९

१८. महाराजा सयाजीराव गायकवाड : लोककल्याणकारी राजा — डॉ. सचिन कोतकर / ८३

१९. लोकनेते शाहू महाराजांचे व्यक्तिमत्त्व — डॉ. शुभांगी दांगट / ८७

२०. अच्युत गोडबोले यांचे लेखनविषयक योगदान — डॉ. बळवंत मगदूम / ९१

२१. आधुनिक भारताचे शिल्पकार : डॉ. बाबासाहेब आंबेडकर — डॉ. अशोक डोळस / ९५

२२. जगप्रसिद्ध भारतीय व्यक्तिमत्त्व : डॉ. बाबासाहेब आंबेडकर — डॉ. सर्जेराव पद्माकर / १००

२३. मराठी चरित्रांमधून व्यक्त झालेले भारतरत्न सचिन तेंडुलकर यांचे व्यक्तिमत्त्व — डॉ. कैलास महाले / १०४, प्रा. विद्या सानप

२४. डॉ. सुनीलकुमार लवटे यांचे साहित्यिक योगदान — प्रा. शौकत आतार / ११०

२५. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद – एक आधुनिक समाजसुधारक — प्रा. स्वाती वाळुंज / ११४

२६. बाबा आमटे : एक थोर समाज सुधारक — प्रा. हनुमंत निमसे / ११८

२७. स्वच्छतेचे दूत : संत गाडगेबाबा — प्रा. वृद्धेश्वर गरुड / १२२

२८. आधुनिक भारताच्या जडणघडणीमध्ये समाजसुधारकांचे योगदान : क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले — प्रा. पल्लवी महाडिक / १२५

२९. रतन टाटा यांचे आधुनिक भारताच्या विकासातील योगदान — प्रा. किरण वणवे / १२९

३०. आधुनिक सहकारमहर्षी : पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील — प्रा. सीमा डोके / १३३

३१. ह.भ.प. प्रा. सोनोपंत दांडेकर व्यक्तित्व आणि कर्तृत्व — प्रा. राहुल भाकरे / १३७

३२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक व राजकीय कार्य — प्रा. सिद्धार्थ बर्वे / १४१


Scanned with OKEN Scanner

# अच्युत गोडबोले यांचे लेखनविषयक योगदान

– डॉ. बळवंत मारुती मगदूम

**प्रस्तावना –**

मराठी साहित्य विविधांगी वाङ्मयीन निर्मितीने भर घालणारे लेखक म्हणजे अच्युत गोडबोले होय. तंत्रज्ञ असणाऱ्या अच्युत गोडबोले यांनी १९८० ते १९९० या दशकात विविध संगणक कंपनीमध्ये विविधपदावर काम केले आहे. त्यांच्या लेखनाचे विषय हे प्रामुख्याने विज्ञान, संगणक तंत्रज्ञान हे राहिले आहेत. त्यांच्या लेखनाचा वर्ग हा जगभर विखुरलेला आहे. केवळ लेखनासाठी त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा देऊन त्यांनी विविधांगी लेखन केले आहे. कधी कधी त्यांनी दीपा देशमुख, डॉ. वैदेही लिमये, अतुल कहाते, माधवी ठाकूरदेसाई, नीलांबरी जोशी या सहलेखकांचीही लेखनासाठी मदत घेतली आहे. त्यांचा एकूण लेखनविषयक योगदानाचा उहापोह करणारा हा लेख.

**अच्युत गोडबोले यांची लेखनविषयक भूमिका –**

अच्युत गोडबोले यांचे आजवरचे लेखन पाहिले तर ते लेखन विज्ञानातील अनेक मूलभूत संशोधनाविषयीचा उहापोह करणारे आहे. ललित लेखनापेक्षा त्यांनी ललितेत्तर लेखन अधिक केले आहे. त्यामुळे अनेकजण त्यांना साहित्यिक म्हणून मान्यता देण्यास कचरतात. हे जरी खरे असले तरी त्यांचे लेखन हे विज्ञानाच्या मूलभूत संकल्पनांची मांडणी करणारे आहे. डॉ. समीरा गुजर –जोशी यांना दिलेल्या मुलाखतीत ते म्हणतात जग अगाध आहे हे समजून घ्या व ते मराठी आणावं, मराठी ही ज्ञान भाषा व्हावी म्हणून मी इतके लेखन केले[१] ही त्यांची लेखनाविषयीची भूमिका असो अथवा मी स्वत: Intrigrater आहे Creative Wirter नाही. ही त्यांनी दिलेली प्रांजल कबुली असो. थोडक्यात 'आपल्याला जे कळलाय ते इतरांना सोप्पं करून सांगण' ही त्यांची लेखनाची धारणा आहे. जी धारणा त्यांनी वेळोवेळी आपल्या लेखनातून आणि मुलाखतीतून कथन केली आहे. अच्युत गोडबोले यांची लेखन शैलीही इतर लेखकांच्यापेक्षा वेगळी आहे. मुळात त्यांच्या लेखनाचे विषय हे सर्व सामान्य पठडीतील नसल्याने किंवा कथनात्म लेखनप्रकार ते हाताळत नसल्याने अनेकांना रुक्ष वाटावे असे विषय वाचकांना आवडी वाटावेत यासाठी त्यांनी खास अशी लेखनशैली निर्माण

केलेली दिसते. त्यांची लेखनाची शैली ही वाचकांशी संवाद साधत पुढे जाणारी आहे. याबरोबरच 'माझ्या सर्व लेखनाची स्टाईल ही सारखी आहे, मला वाचकांशी संवाद साधत लिहायला आवडत. माझे लेखन तीन लेव्हल वरती चालते. एक म्हणजे त्या विषयाचा इतिहास, त्या विषयातील शिलेदारांची चरित्रे, आणि त्या विषयाची मूलतत्त्वे' अशा त्रिसूत्रीने त्यांचे सर्व लेखन लिहिले गेले आहे. ते लेखन विपुल तर आहेच पण त्यामध्ये कमालीचे विषय वैविध्य आहे.

**अच्युत गोडबोले यांचे लेखन –**

अच्युत गोडबोले हे तंत्रज्ञ, समाजसेवक आणि मराठीतील लेखक आणि वक्ते आहेत. विज्ञान, संगणक, तंत्रज्ञान आणि व्यवसाय या विषयांवर त्यांनी प्रामुख्याने लेखन केले आहे. यांच्या एकूण लेखनाचा थोडक्यात परिचय करून घेऊ.

अच्युत गोडबोले यांची जवळपास ४० ग्रंथाचे लेखन केले आहे. त्यामध्ये वैचारिक, संगीत, व्यवस्थापन, अर्थशास्त्रापासून मानसशास्त्रापर्यंतच्या ग्रंथाचा समावेश होतो. अर्थात, अनर्थ विकासनीती : सर्वनाशाच्या उंबरठ्यावर, जीनिअस अलेक्झांडरफ्लेमिंग, जीनिअस अल्बर्ट आईनस्टाईन Operating Systems, जीनिअस आयझॅक न्यूटन, जीनिअस एडवर्ड जेन्नर, कॅनव्हास, किमयागार, गणिती, ग्रेट भेट, जीनिअस गॅलिलिओ गॅलिली, गुलाम : स्पार्टाकस ते ओबामा, झपूर्झा – भाग १, २, ३, Data Communications And Networks, Demystifying Computers, थैमान चंगळवादाचे , नॅनोदय, नादवेध, बखर संगणकाची, बोर्डरूम, मनकल्लोळ भाग १ व २ , मनात जीनिअस मेरी क्युरी, जीनिअस जे. रॉबर्ट ओपेनहायमर, जीनिअस रॉबर्ट कॉख, जीनिअस रिचर्ड फाईनमन, रक्त, लाईम लाईट : विदेशी चित्रपटसृष्टीची अनोखी यात्रा, जीनिअस लीझ माइट्नर, जीनिअस लुई पाश्चर, Web Technologies, संगणक– युग, संवाद, जीनिअस स्टीफन हॉकिंग, स्टीव्ह जॉब्ज : एक झपाटलेला तंत्रज्ञ हे ते ग्रंथ या शिवाय त्यांनी मुसाफिर या नावाने स्वत:चे आत्मकथन प्रकाशित केले आहे.

यापैकी दीपा देशमुख या सहलेखिकेच्या मदतीने लिहिलेला, जगभरातील संशोधकांच्या कार्याचा आढावा घेणारा 'जग बदलणारे १२ जीनियस' हा पुस्तकांचा संच विशेष महत्त्वाचा आहे. ज्यामध्ये कर्करोगाच्या उपचारात नवी क्रांती घडवून आणणाऱ्या मेरी क्युरी, अणुबॉम्बचे जनक जे. रॉबर्ट ओपेनहायमर, क्षय रोगाबद्दल महत्त्वपूर्ण संशोधन करणारे हाइनरिक हेर्मान रोबर्ट कॉख, किरणोत्सर्ग आणि अणुगर्भ विज्ञान यावर मूलभूत संशोधन करण्याच्या लीझ माइट्नर अशा अनेक संशोधक शास्त्रज्ञ यांच्याविषयी लेखन केले. त्यांनी लिहिलेले वरील ग्रंथ हे त्या त्या विषयाची मूलभूत संकल्पना मांडणारे आहेत तर काही ग्रंथ हे माहितीपर आहेत. जरी हे ग्रंथ माहितीपर असले तरी त्यातील माहिती ही प्राथमिक नाही तर



Scanned with OKEN Scanner

मूलभूत आहे. ही मूलभूत माहिती देत असताना ती माहिती रंजक पद्धतीने वाचकांच्यापर्यंत पोहचविण्याची विशेष काळजी घेतात. त्यांचे सूक्ष्मजंतू, नॅनोदय, रक्त, अनर्थ, गणिती, मनात हे ग्रंथ तर सोप्या भाषेत विज्ञानापासून मानवी मनाची संकल्पना समजून सांगणारे आहेत. त्यांनी केलेले एकूण लेखन हे वैविध्यपूर्ण तर आहे शिवाय वाचकांना ते जिज्ञासूपणे स्वत:कडे खेचून घेतात.

लीझ माइट्नर, मेरी क्युरी, जे. रॉबर्ट ओपेनहायमर यांच्या कार्याचा आढावा घेण्याबरोबरच मुळात जगणे हे संघर्षकारी असताना या संघर्षकारी जगण्यात विश्वाच्या उत्पत्तीचा शोध घेणारे स्टीफन हॉकिंग यांच्यावरील त्यांचा जीनियस स्टीफन हॉकिंग हा ग्रंथ हा केवळ आणि केवळ अच्युत गोडबोलेच लिहू शकले. असे म्हणावे लागले. मानव जातीच्या कल्याणासाठी स्वआयुष्यातील प्रतिकूलता बाजूला सारून अखंड मानव जातीच्या कल्याणासाठी कार्यरत राहणारे शास्त्रज्ञ हे त्यांनी आपल्या लेखणीचे विषय केले आणि त्यांच्या जीवनचरित्राबरोबरच साक्षेपीपणे त्यांच्या कार्याचे वेगळेपण वाचकांच्या पुढे आणले. त्या त्या विषयाचे उपलब्ध साहित्य वाचणे आणि त्यातून विषयाच्या मांडणीसाठी आवश्यक अवकाश उभा करणे हा त्यांचा कोणत्याही विषयाच्या मांडणी मागील सिद्धांत असून त्यांनी तो कटाक्षाने पाळलेला आढळतो. म्हणूनच मानवी मनाची गुंतागुत मांडणारा ग्रंथ त्यांचा मनात हा ग्रंथ आहे. एखाद्या मानसशास्त्रज्ञाने मानवी मनाविषयी लिहिणे आणि अच्युत गोडबोले यांनी मांडणी करणे यामध्ये बरीचसे वेगळेपण आहे. जे या ग्रंथात जाणवते. त्यांनी हा ग्रंथ त्यांना भावलेल्या गोष्टीपासून सुरुवात करून ऐतिहासिक क्रमाने मानसशास्त्राचा प्रवास लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. मानसशास्त्रज्ञ या विषयाकडे ज्या दृष्टीने पाहतो त्यापेक्षा वेगळा दृष्टिकोन ठेवून त्यांनी या ग्रंथाचे लेखन केले आहे. त्यासाठी त्यांनी मानवी मनाची अवस्था कथन करण्यासाठी संत वचनांचा आधार घेतला आहे. त्याचा हा ग्रंथ असो वा सुमारे ७० मनोविकारांची, त्यांच्या टेस्ट केसेस, त्या विकारांचा इतिहास, लक्षणे, कारणे आणि उपचार अशी समग्र माहिती देणारा दोन भागात विभागलेला 'मनकल्लोळ' हा ग्रंथ असो. वा स्टीव्ह जॉबच्या जीवन आणि कार्यावर प्रकाश टाकणारा त्यांचा स्टीव्ह जॉब : एक झपाटलेला तंत्रज्ञ हा ग्रंथ. संगणकाचा थक्क करणारा प्रवास कथन करणारा बखर संगणकाची हा ग्रंथ. या साऱ्या लेखनात एक प्रकारची शिस्त पाळलेली दिसते. इतक्या विपुल लेखनात ही पथ्ये पाळणे हे विशिष्ट भूमिकेशिवाय अशक्य आहे. असे म्हणावे लागेल.

**लेखनाचे वेगळेपण –**

अच्युत गोडबोले यांच्या लेखनाचे वेगळेपण अधोरेखित करताना प्रकर्षाने जाणवणारी बाब म्हणजे त्यांच्या एकूण लेखनाला वाङ्मय म्हणून मान्यता मिळण्यास

अडचण आहे. हे निखळ शास्त्र ग्रंथ नाहीत. त्यामुळे शास्त्र ग्रंथ म्हणूनही यांना मान्यता देणे अडचणीचे आहे. शास्त्र रंजकपणे वाचकांच्या समोर मांडत असताना त्याला आवश्यक कथनात्मकतेचे जोड दिली आहे. ही कथनात्मकता त्यांच्या लेखनाला ललित लेखनाकडे घेवून जाते. त्यामुळे अच्युत गोडबोले यांचे संपूर्ण लेखन हे साहित्य वर्गीकरणाच्या कोणत्या प्रकारात टाकायचे हा प्रश्न आहे. हे जरी खरे असले तरी त्यांनी मराठी साहित्याला समृद्ध केले. हे मान्यच करावे लागेल. त्यांच्या लेखनाचे जाणवणारे विशेष पुढीलप्रमाणे –

१. अनेक विषयावर सखोल अभ्यास करून तो विषय वाचकांना सोप्या भाषेत समजावला.
२. आपला भवताल समजून घेण्यातून लेखन.
३. मराठी ही ज्ञान भाषा व्हावी. या हेतूने लेखन.
४. आपल्याला जे कळलाय ते इतरांना सोप्पं करून सांगण ही त्यांची लेखनाची धारणा.
५. वाचकांशी संवाद साधत पुढे जाणारी लेखनशैली.
६. कठीण विषय वाचकाच्या गळी उतरविण्यासाठी रंजकपद्धतीने विषयाची मांडणी.
७. ग्रंथांच्या शीर्षकनिवडीमागे विशेष दृष्टिकोन.
८. बखर, चंगळवाद, अर्थात, कॅनव्हास, किमयागार, गुलाम व बोर्डरूम या शीर्षकातून ग्रंथाचे वेगळेपण अधोरेखित करण्याचा प्रयत्न.
९. एखाद्या विषयाच्या समग्र आकलनास स्वत:च्या मर्यादा जाणवल्यास ग्रंथ लेखनासाठी त्या त्या विषयातील उत्तम अभ्यासकाचा मदतीने ग्रंथ लेखन केले.

**समारोप –**

एखादा विषय मुळातून समजून घेण्यासाठी अच्युत गोडबोले यांच्या लेखनाकडे आजही मोठा वाचक वर्ग वळतो आहे. हे लेखक म्हणून त्यांचे योगदान आहे. वाचकाने पहिल्यांदाच वाचनासाठी हातात ग्रंथ तो दूर करण्याअगोदर अच्युत गोडबोले यांची लेखनशैली वाचकाचा ताबा घेवून त्याला रुक्ष वाटणाऱ्या अशा विषयात गुंतवून ठेवते. विषय कोणताही असो त्या त्या विषयाचा इतिहास, तो रंजकपणे उभा करणे. त्या विषयाशी निगडित वादस्थळे या सर्वांचा त्यांचे ग्रंथ सांगोपांग विचार करतात. इतक्या विविध विषयावर इतके मूलभूत लेखन करणारे अच्युत गोडबोले हे एकमेव लेखक आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**संदर्भ –**


१. https://www.youtube.com/watch?v=JaxXUNGxsPM